केंद्र शासनाचे "कलाकारांना निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय मदत योजना" या योजनेअंतर्गत केंद्राकडे शिफारस प्रस्ताव पाठविताना करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. केंवृमा ४४१४/प्र. क्र. ४०/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय सम क्रमांक दिनांक १ जुलै, २०१५
२) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाचा क्र. २-१२/२०१७-P.Arts, दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ चा आदेश.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या "कलावंतांना निवृत्ती वेतन योजना व कल्याण निधी" या योजनेस "कलावंत निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय मदत योजना" असे नाव देण्यात आले आहे. सदर योजना सन २०१७-१८ ते २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी राबविण्यात येणार आहेत. "कलावंत निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय मदत योजना" च्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने शासनाचा सम क्रमांकाचा दिनांक १ जुलै, २०१५ चा शासन अधिक्रमित करण्यात येत आहे व पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या "कलावंत निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय मदत योजना" या योजनेअंतर्गत कलाकारांना रुपये ४,०००/- प्रतिमाह इतके निवृत्ती वेतन अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावाबाबत संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशासोबतच्या परिशिष्टातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. "कलावंत निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय मदत योजना" या योजनेअंतर्गत निवृत्ती वेतनासाठी अर्ज सादर करावयाची पध्दत पुढीलप्रमाणे :-

१. "कलावंत निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय मदत योजना" या योजनेअंतर्गत राष्ट्रीय कलाकार निवृत्ती वेतनासाठी कलावंतांनी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे केंद्र शासनाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
२. सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केंद्र शासनाच्या अटी व नियमानुसार प्रस्तावाची तपासणी करुन पात्र कलावंतांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करावेत.
३. राज्य शासनाकडून पडताळणी केल्यानंतर केंद्र शासनाकडे कलावंतांना राष्ट्रीय कलाकार निवृत्ती वेतनासाठी लाभ मिळण्यासाठी शिफारसपत्र पाठविण्यात येईल.

केंद्र शासनाच्या सदर योजनेची अधिक माहिती पुढील वेबसाईटवर उपलब्ध आहे. http://www.indiaculture.inc.in/artists-pension-scheme-and-welfare-fund व http://www.mahasanskruti.org

संदर्भाधीन केंद्र शासनाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशासोबतच्या परिशिष्टातील मार्गदर्शक सूचनेत नमूद अटी व शर्ती "कलावंत निवृत्ती वेतन आणि वैद्यकीय सेवा योजना" या योजनेअंतर्गत निवृत्ती वेतनाचा लाभ घेण्यासाठी जशाच्या तशा लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शिल्पा स. कवळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२
३. सह सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
६. निवड नस्ती, सां.का.४

महाराष्ट्र शासन

क्रमांक : क्षेसांके ७५१८(११)/प्र. क्र.२१३/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०१८

प्रति,

संचालक,
दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर
५६/१ सिव्हील लाईन,
नागपूर ४४० ००१

विषय :- <u>सन २०१८-२०१९ या वर्षाची वित्तीय समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.</u>

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर या केंद्राच्या सन २०१८-२०१९ या वर्षीच्या वित्तीय समितीची बैठक दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी ११-०० वाजता प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त ई-मेलद्वारे प्राप्त झाले आहे.

२. सदर इतिवृत्तास मा. अध्यक्ष, वित्तीय समिती, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर तथा प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांनी मान्यता दिलेली आहे.

(शिल्पा स. कवळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन